पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १५७ ■ रविवार, दि. १४ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 ■ Email: citynewss80@gmail.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा

# मराठी माणूस पंतप्रधानपदी विराजमान होऊ शकतो?

## पृथ्वीराज चव्हाण यांच्या वक्तव्यावरून राजकीय वर्तुळात खळबळ!





प्रतिनिधी १४ डिसेंबर

**पुणे:** काँग्रेस नेत्याच्या एका खळबळजनक वक्तव्याने देशाच्या राजकारणात खळबळ उडवून दिली आहे. १९ डिसेंबर रोजी देशाचा पंतप्रधानच बदलणार आहे. देशाच्या पंतप्रधान पदी मराठी माणूस असेल, असा दावा काँग्रेसचे नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी पिंपरी चिंचवड येथील एका कार्यक्रमादरम्यान केला आहे.

पृथ्वीराज चव्हाण यांनी प्रदीर्घ काळ पीएमओ कार्यालयात काम केलेले आहे. दिल्लीत त्यांचे अजूनही चांगले संबंध आहेत. विशेष म्हणजे या महिन्यात त्यांनी दुसऱ्यांदा हा दावा केला आहे. तर या दाव्यानंतर राजकीय वर्तुळात अनेक तर्क वितर्क लावले जात आहेत, अशातच पंतप्रधान पदासाठी संधी ही महाविकास आघाडी किंवा इंडिया आघाडीतील कोणाला मिळण्याचा काही विषय नाही कारण आमची संख्या तेवढी नाही, तर नागपुरातील भाजपच्या नेत्यांना संधी मिळण्याची शक्यता असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

मराठी माणूस पंतप्रधानपदी विराजमान होऊ शकतो या पृथ्वीराज चव्हाण यांच्या वक्तव्यावरून गेल्या काही दिवसात राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे. तर अलीकडेच

### अमेरिकेतील नव्या कायद्याचाही दिला दाखला

पृथ्वीराज चव्हाणांनी हा दावा करताना जगात घडणाऱ्या घडामोडींचे संदर्भ दिलेत. अमेरिकेतील नव्या कायद्याचा ही दाखला चव्हाणांनी दिला. अमेरिकेतील एक व्यक्ती जो इस्त्राईलचा गुप्तहेर होता. त्याने अनेक दिग्गज व्यक्तींच्या बंगल्यात कॅमेरे लावून स्टिंग ऑपरेशन केलेत, आता लवकरचं तो अनेकांचा पर्दाफाश करणार आहे. त्यामुळं अमेरिकेत मोठा धुमाकूळ होणार आहे. अमेरिका सरकार एक कायदा करुन येत्या १९ डिसेंबरला त्या दिग्गजांची नावं जाहीर करणार आहे. असा दावा चव्हाणांनी केला. आता यात कोणाकोणाची नावं आहेत? याची मला फारशी कल्पना नाही. असं म्हणत चव्हाणांनी अमेरिकेतल्या स्टिंग ऑपरेशनचे पडसाद भारतात उमटण्याची शक्यता वर्तवली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देशाचे गृहमंत्री अमित शहा यांची जवळीक पाहिली तर काय एकंदरीत समीकरण दिसून येते या एका वृत्तवाहिनीच्या प्रश्नावर पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, एक निश्चित आहे की काँग्रेसचा किंवा महाविकास आघाडीचा किंवा इंडिया आघाडीचा कोणी पंतप्रधान होणार नाही, कारण आमची तिथे संख्याच नाहीये, त्यामुळे झालं तर भाजपचा कोणीतरी होईल, जर असं काही अघटीत घडलं तर मग नागपूरच्या लोकांना संधी आहे, त्या संदर्भात मी बोललो होतो, असंही ते पुढे म्हणालेत. येत्या १९ डिसेंबरला देशात सर्वात मोठा राजकीय भूकंप होईल, भारताचा पंतप्रधान बदलेल अन मराठी माणूस पंतप्रधान होईल, ती व्यक्ती भाजपचीच असू शकते, असं भाकीत माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाणांनी केलं.

## २ मंत्री आजारी, १० आमदारांना ताप, १३५५ पोलिसांनाही उच्च रक्तदाबाचा त्रास

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**नागपूर :** सध्या नागपुरात महाराष्ट्र विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन सुरू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर या अधिवेशनाला विशेष महत्व होतं. अधिवेशनात सरकारकडून काय निर्णय घेतले जाणार? काय घोषणा केल्या जाणार? याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं होतं. एकीकडे हे अधिवेशन सुरू असताना आता विधीमंडळातून एक खळबळजनक माहिती समोर आलं आहे. या अधिवेशनादरम्यान, दोन मंत्र्यांसह दहा आमदार आणि जवळपास १३५५ कर्मचारी आजारी पडल्याचं समोर आलं आहे.

## राकेश ओला अमरावती शहराच्या नवीन पोलीस आयुक्त नियुक्ती

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**अमरावती :** अमरावती शहर पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांची अमरावती शहर पोलीस आयुक्तालयातून बदली करण्यात आली आहे.

त्यांच्या जागी बृहन्मुंबईचे पोलीस उपायुक्त राकेश ओला यांची अमरावती येथे बदली करण्यात आली आहे. राज्य सरकारचे सहसचिव व्यंकटेश भट यांनी शनिवारी, १३ डिसेंबर रोजी हे आदेश जारी केले. अरविंद चावरिया यांचे नियुक्तीचे आदेश स्वतंत्रपणे जारी करण्यात येतील. महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा बदल करण्यात आल्या असल्याचे बोलले जात आहे.

## १००० कोटींच्या सायबर फ्रॉड रॅकेटचा भंडाफोड

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**मुंबई:** ऑनलाइन गुंतवणूक, कर्ज आणि नोकरीचे आमिष दाखवून देशभरातील हजारो नागरिकांची फसवणूक करणाऱ्या एका मोठ्या आणि संघटित सायबर फ्रॉड नेटवर्कचा केंद्रीय तपास ब्यूरो (ग्ँघ) ने पर्दाफाश केला आहे. या नेटवर्कच्या माध्यमातून देश-विदेशात ?१००० कोटींपेक्षा अधिक रकमेची हेराफेरी झाल्याचे तपासात उघड झाले आहे. या प्रकरणात ग्ँघ ने १७ आरोपींविरोधात आरोपपत्र दाखल केले असून, त्यात ४ परदेशी नागरिकांचा समावेश आहे. तसेच ५८ कंपन्यांवर कठोर कारवाई करण्यात आली आहे.

## फुटबॉलपटू लिओनल मेस्सी आज मुंबईत

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**मुंबई:** महान फुटबॉल खेळाडू लायोनेल मेस्सी यांच्या भारत दौऱ्याने देशभरात फुटबॉलप्रेमींच्या मनात उत्सुकता निर्माण झाली आहे. जगातील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या आर्गेंटिनियन स्टारने शनिवारपासून तीन दिवसांच्या दौऱ्याची सुरुवात केली असून, आज मुंबईत त्यांचे स्वागत होत आहे. मेस्सी दुपारी ३ वाजता वानखेडे स्टेडियमला पोहोचेल आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महादेव प्रकल्पाचे उद्घाटन होईल.

## वसईत पाच वर्षाच्या मुलीवर बलात्कार करून हत्या

**मुंबई:** महाराष्ट्रातील वसईमध्ये १८ वर्षांपूर्वी एक पाच वर्षाच्या मुलीवर बलात्कार करण्यात आला. त्यानंतर आरोपीने मुलीची हत्या केली होती. प्रकरणाचा तपास करत असलेल्या पोलिसांनी आरोपीला १८ वर्षानंतरही शोधून काढले.

२००७ मध्ये पालघर जिल्ह्यातील वसईमध्ये एक घटना घडली. त्यावेळी २२ वर्ष वय असलेल्या तरुणाने एका पाच वर्षाच्या मुलीवर अत्याचार केला. अत्याचारानंतर आरोपीने तिची हत्या केली. या घटनेनंतर आरोपी फरार झाला. पण, पोलिसांनी ठरवले, तर ते कुठून आरोपीला शोधून काढतात, त्याची प्रचिती या प्रकरणात आली आहे. पोलिसांनी १८ वर्षे चकमा देणाऱ्या या आरोपीला अटक केली. उत्तर प्रदेशात जाऊन त्याच्या मुसक्या आवळण्यात आल्या.

## मनपा निवडणुकीची लवकरच आचार संहिता लागू होण्याची शक्यता!

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**अकोला:** अकोला महानगरपालिका प्रशासनाने आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तयारी सुरू केली आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांनी शुक्रवारी तातडीची बैठक बोलावली आणि निवडणुकीच्या तयारीचा सखोल आढावा घेतला. बैठकीत त्यांनी सर्व विभागांना आचार संहिता लागू होण्यापूर्वीच सर्व आवश्यक कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

महानगरपालिका निवडणुकीसाठी पुढील आठवड्याच्या सुरुवातीलाच आदर्श आचार संहिता लागू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मनपाच्या निवडणूक कक्षाकडून तयारीला अंतिम रूप दिले जात आहे. मुंबईतून साहित्य संकलन करणे, दुबार नावांची पडताळणी करणे आणि कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीसाठी सरकारी विभागांना पत्रे पाठवली जात आहेत. याशिवाय, विद्युत विभागाकडून लवकरच ईव्हीएम मशीनची तपासणी आणि चाचणी केली जाईल.महापालिका आयुक्तांनी प्रामुख्याने शहरातील मतदान केंद्रांची पाहणी आणि पडताळणी करण्यावर, तसेच मतदार याद्या अद्ययावत ठेवण्यावर विशेष भर दिला. निवडणुकीसाठी आवश्यक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मागणीसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाला तातडीने पत्र पाठवण्याचे आदेश त्यांनी दिले. महापालिका निवडणुकीची आदर्श आचार संहिता लागू होण्यापूर्वी निवडणुकीशी संबंधित सर्व छोटी-मोठी कामे त्वरित पूर्ण करावी, असे निर्देशही आयुक्तांनी दिले. यावेळी आयुक्त लहाने यांच्यासह बैठकीत अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोणे, उपायुक्त विजय परतवार, उपायुक्त दिलीप जाधव आणि सर्व सहायक आयुक्तांसह अधिकारी उपस्थित होते.

## मनपा जि. प. निवडणुकीसाठी उमेदवार ऑफलाईन अर्ज भरू शकणार....!

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**अकोला:** राज्यातील आगामी महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी इच्छुक उमेदवार पारंपारिक ऑफलाईन पद्धतीने आपले नामांकन दाखल करू शकतील. असे आज राज्य निवडणुक आयोगाने स्पष्ट केले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका लक्षात घेऊन महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत सर्व उमेदवार ऑफलाईन अर्ज (नामांकन अर्ज) दाखल करू शकतील. राज्यात २९ महानगरपालिका, ३२ जिल्हा परिषद आणि ३३६ पंचायत समित्यांच्या निवडणुका होणार आहेत. यापूर्वी, राज्य निवडणूक आयोगाने नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीत उमेदवारांना फक्त ऑनलाईन नामांकन सुविधा दिली होती. परंतु, राजकीय पक्ष आणि उमेदवारांच्या विरोधामुळे नंतर ऑफलाईन अर्ज भरण्याची परवानगी देण्यात आली होती. दरम्यान, निवडणूक आयोगाने संबंधित महानगरपालिका आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना संभाव्य दुहेरी नावे असलेल्या मतदारांची तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर मतदार आपले नाव शोधू शकतात. यासोबतच, 'मताधिकार' नावाचे मोबाईल ॲप देखील विकसित करण्यात आले आहे. आगामी महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीसाठी सर्व उमेदवारांना ऑफलाईन नामांकन दाखल करण्याची सुविधा मिळाल्यामुळे, नामांकन दाखल करताना उमेदवार आपले शक्ती प्रदर्शन करू शकतील.

## अकोल्यात दोन तर यवतमाळात तिघांचा अपघातात मृत्यू!

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**अकोला/यवतमाळ :** शनिवारी रात्री अकोला नजिक घुसरजवळ कापसाची वेचणी करून परतत असलेल्या मजुरांचे वाहन उलटल्यामुळे दोन मजुरांचा मृत्यू झाला. तसेच राळेगाव तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ बी वर सांवगी पेरका गावाजवळ शुक्रवारी सायंकाळी भरधाव सिल्व्हर रंगाच्या वॅगनर कारने दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेनंतर साखळी अपघात घडला, ज्यात एकाचा जागीच मृत्यू झाला, तर दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.अकोला : शनिवारी रात्री घुसरनजीक झालेल्या भीषण अपघातात मुन्नीबाई जांभेकर (४५) यांचा जागीच मृत्यू झाला. मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर येथून कुटुंबाच्या पोटासाठी अकोल्यात आलेल्या मुन्नीबाईंच्या हातात कापूस वेचणीची मजुरी होती पण घरी परतण्याआधीच त्यांचा श्वास थांबला. घुसरनजीक पॉवर हाऊससमोर चालकाचे नियंत्रण सुटले आणि वाहन रस्त्याच्या कडेला उलटले. क्षणार्धात सगळं संपलं. अपघात इतका भीषण होता की काही मजूर थेट रस्त्यावर फेकले गेले. मुन्नीबाईसह मनिष कासदेकर (३७) यांचाही जागीच मृत्यू झाला. ११ मजूर गंभीर जखमी झाले असून काहींची प्रकृती चिंताजनक आहे. स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी मुन्नीबाई आणि मनीष यांना मृत घोषित केले. यवतमाळ : राळेगाव तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ बी वर सांवगी पेरका गावाजवळ शुक्रवारी सायंकाळी भरधाव वॅगनर कारने (क्र. एमएच ४० एआर ४३८९) मोपेडला जोरदार धडक दिली. या धडकेनंतर साखळी अपघात घडला, ज्यात एकाचा जागीच मृत्यू झाला.

## विरोधी पक्षनेतेपद द्यायचं नसेल तर स्पष्ट सांगा!

### पृथ्वीराज चव्हाणांची फडणवीसांवर टीका

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**पुणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनाचा मोठेपणा दाखवत विरोधी पक्षनेतेपदावर स्थान दिले पाहिजे. देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा अध्यक्ष किंवा सभापती यांच्या मागे लपू नये. हा सर्व अधिकार त्यांचा आहे. आणि त्यांना विरोधी पक्षनेतेपद द्यायचं नसेल, तर त्यांनी तसंही स्पष्ट सांगावं, असे म्हणत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी फडणवीस यांच्यावर टीका केली.माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आज पिंपरी-चिंचवड येथे एका कार्यक्रमात आले होते. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर कडवी टीका केली. विरोधी पक्षनेतेपदावर प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा अध्यक्ष तसेच सभापती यांच्या मागे लपू नये, असं म्हणत त्यांनी मुख्यमंत्र्यांवर निशाणा साधला. महाराष्ट्र सरकारने, मुख्यतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, मोठेपणा दाखवत विरोधी पक्षाला स्थान दिले पाहिजे.

## इंडिगोचे संकट वाढले!

### ८२९ प्रवासी सामूहिक खटला दाखल करणार!

वृत्तसंस्था १४ डिसेंबर

**नवी दिल्ली :** देशातील सर्वात मोठी विमान कंपनी असलेल्या इंडिगोच्या विमानांच्या वेळापत्रकात आणि सेवांमध्ये आलेल्या प्रचंड गोंधळामुळे प्रवाशांचे हाल सुरूच आहेत. अनेक विमानांना झालेला विलंब, उड्डाणे रद्द होणे आणि प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या वाईट वागणुकीमुळे कंपनीचे संकट अधिक गडद झाले आहे. आता परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, जवळपास ८२९ संतप्त प्रवाशांनी एकत्र येऊन भरपाईसाठी न्यायालयात खटला दाखल करण्याची तयारी केली आहे.

प्रवाशांच्या बाजूने बोलणारे हवाई वाहतूक क्षेत्रातील तज्ज्ञ आणि ग्राहक संरक्षण वकील असणाऱ्या डॉ. सुधीर शुक्ला यांनी हा मोठा दावा केला आहे. इंडिगोच्या खराब सेवांमुळे झालेल्या नुकसानीसाठी हे ८२९ प्रवासी एकत्र येत आहेत आणि लवकरच ते कंपनीविरुद्ध कोर्टात भरपाईसाठी दावा दाखल करतील. गेल्या काही महिन्यांपासून इंडिगो विमानांचे वेळापत्रक पूर्णपणे कोलमडले आहे. अनेक तास विलंबाने उड्डाण करणे, ऐनवेळी विमाने रद्द करणे आणि प्रवाशांना बोर्डिंगपासून वंचित ठेवणे यांसारख्या घटना नित्याच्या झाल्या आहेत.

## केरळमध्ये काँग्रेसची जोरदार मुसंडी भाजपाचा चंचू प्रवेश अन् डाव्यांना धक्का!

वृत्तसंस्था १४ डिसेंबर

**तिरूवनंतपुरम :** शनिवारी लागलेल्या केरळमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये राज्यात दहा वर्षांपासून सत्ता असलेल्या डाव्या पक्षांचा आघाडीची मोठी पीछेहाट झाली. तर राज्यातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीने जोरदार मुसंडी मारली आहे. तसेच आतापर्यंत केरळमध्ये नाममात्र अस्तित्व असलेल्या भाजपाने राज्यातील शहरी भागांमध्ये उल्लेखनीय यश मिळवले आहे. आता या निकालांमुळे केरळमधील राजकीय हवा बदलत असल्याचे संकेत मिळत असून, या निकालांचा २०२६ मध्ये होणाऱ्या केरळमधील विधानसभा निवडणुकीवर काय परिणाम होईल, याबाबतचे वेगवेगळे तर्कवितर्क लढवले जात आहेत.

केरळमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निकालांना २०२६ च्या विधानसभा निवडणुकांपूर्वी वाहत असलेल्या राजकीय हवेची दिशा स्पष्ट केली आहे.

### आर. श्रीलेखा तिरुवनंतपुरमच्या महापौर होण्याची शक्यता!

केरळच्या राजकारणात सध्या भूकंपासारखी मोठी घटना घडली आहे. तिरुवनंतपुरम महापालिकेच्या निवडणुकीत भाजपने अभूतपूर्व यश मिळवत, डाव्या लोकशाही आघाडीचा मजबूत बालेकिल्ला उद्ध्वस्त केला आहे. या निवडणुकीत भाजपने १२३ जागांपैकी तब्बल ५० वॉर्डांमध्ये एकहाती विजय मिळवला आहे. यामुळे केरळच्या राजकारणात एक मोठे आणि महत्त्वाचे वळण येण्याची शक्यता आहे. केरळ कॅडरमधील पहिल्या महिला आयपीएस अधिकारी राहिलेल्या आर. श्रीलेखा या तिरुवनंतपुरमच्या महापौर बनू शकतात, अशी जोरदार चर्चा सुरू आहे. तिरुवनंतपुरम शहरात डाव्या पक्षाचा मजबूत बालेकिल्ला असून, येथे भाजप एका मोठ्या राजकीय खेळीच्या तयारीत असल्याचे मानले जात आहे.

## राज्यभरात थंडीचा कडाका वाढला!



### जळगावातील दोघांचा थंडीने मृत्यू

जळगाव जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून शीतलहर कायम आहे. किमान तापमान ७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने जिल्हावासीयांना हुडहुडी भरली आहे. दरम्यान, जळगाव तालुक्यात शुक्रवारी सकाळी रात्रपाळी करून आलेल्या कामगाराचा, तर दुसऱ्या घटनेत नशिराबाद येथे मंदिराच्या ओट्यावर वृद्ध व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. या दोघांचा कडाक्याचा थंडीमुळे मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज वैद्यकीय सूत्रांनी वर्तवला आहे.

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**मुंबई :** मुंबईसह राज्यभरातही थंडीचा कडाका वाढला आहे. हवामान विभागाने सात जिल्ह्यांमध्ये थंडीच्या लाटेचा इशारा दिला असून इतर राज्यातही तापमानाचा पारा खाली उतरणार असल्याची माहिती दिली आहे. राज्यातील अनेक शहरात तापमानाचा आकडा १० अंशांवर पोहोचला आहे. उत्तरेकडून वाहणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे राज्यभरात थंडीचा कडाका वाढला असून हवामान खात्याने यलो अलर्ट दिला आहे.

हवामान खात्याने मध्य महाराष्ट्रात थंडीची लाट पसरणार असल्याचा इशारा दिला आहे. धुळे, नाशिक, नंदुरबार, अहिल्यानगर, पुणे, सोलापूर आणि जळगावात तापमानाचा पारा खाली उतरुन थंडीच्या लाटेची शक्यता वर्तवली आहे. राज्यभरात किमान तापमानाचा पारा १५ अंशांखाली गेला आहे. मुंबईतही शुक्रवारी पहाटेपासून थंडी वाढली आहे. शनिवारीही मुंबईचं किमान तापमान १५ अंशांच्या आसपास होतं. रविवारी तापमानात काहीशी वाढ होण्याची शक्यता आहे. किमान तापमान १८ अंशापर्यंत असेल असा अंदाज आहे. मात्र ३१ डिसेंबरपर्यंत हवामान थंड राहील, तापमानाचा पारा कमीच राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.


## पुणे आता गुंडांचे माहेरघर

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**नागपूर:** पुण्याला ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट म्हणायचे ते आता गुंडांचे माहेरघर झाले आहे. गँगवॉर तर नित्याची बाब झाली आहे. खंडणी प्रथा बळावते आहे. पुण्यात व्यवसाय करणे अशक्य झाले आहे. पुण्यात शिक्षण घेणाऱ्या मुलींना पोलिसांनी जातीवाचक शिवीगाळ केली. पोलीस एफआयआर घेत नाहीत. त्या मुलींनी लढा दिला. अनगरमध्ये नगराध्यक्ष पदाच अर्ज भरून दिला नाही. ही कायदा सुव्यवस्थेची अवस्था आहे. बाळासाहेब थोरात यांना उद्देशून आम्हाला नथुराम व्हावे लागेल अशी भाषा वापरली गेली.

## कचरा गोळा करणारे कर्मचारी करत आहेत व्यापाऱ्यांची लूट!

प्रतिनिधी १४ डिसेंबर



**अकोला:** अकोला शहरात कचरा गोळा करणाऱ्या कंपनीचे कर्मचारी मनमानी करत आहेत. नियमानुसार व्यावसायिकांकडून १२० ऐवजी २५० ते ३०० रुपये वसूल केले जात असल्याने व्यापारी त्रस्त झाले आहेत. शहराचा कचरा साफ करण्याऐवजी व्यापाऱ्यांचे खिसे साफ केले जात आहेत. कचरा गोळा करणाऱ्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांवर कोण नियंत्रण ठेवणार? हा मोठा प्रश्न निर्माण होत आहे.

अकोला शहरातील कचरा गोळा करणाऱ्या नागपूरच्या अर्बन एन्व्हायरमेंट लिमिटेड कंपनीचे कर्मचारी मनमानीवर उतरले आहेत. नियमांनुसार, अकोल्यातील नागरिकांच्या घरातून निघणाऱ्या कचरा संकलनासाठी ५० रुपये आणि व्यावसायिक आस्थापनांमधून निघणाऱ्या कचरा संकलनासाठी १२० रुपये घेणे आवश्यक आहे. परंतु, कंपनीच्या कचरा गाड्यांवर कार्यरत कर्मचारी व्यावसायिक आस्थापनांकडून २५० ते ३०० रुपये मनमानी पद्धतीने वसूल करत आहेत. विशेष म्हणजे घंटागाडीवर लावलेल्या लाऊडस्पीकरवरून नागरिकांच्या घरातून निघणाऱ्या कचऱ्यासाठी ५० आणि

### 120 ऐवजी घेतले जात आहेत 300 रुपये

व्यावसायिक आस्थापनांमधून निघणाऱ्या कचरा संकलनासाठी १२० रुपये अशी घोषणा केली जाते. असे असूनही, कंपनीचे कर्मचारी व्यावसायिकांकडून २५० ते ३०० रुपये वसूल करत आहेत. जो व्यावसायिक जास्त पैसे देण्यास नकार देतो, तेथील कचरा संकलित न करता त्यांना कारवाईची धमकी दिली जात आहे. एका अर्थाने, शहरात हा 'जिझिया कर' वसूल केला जात आहे. कंपनीला दररोज किमान २१० मेट्रिक टन कचरा गोळा करणे अनिवार्य आहे, परंतु कंपनीकडून दररोज केवळ सुमारे १०० मेट्रिक टन कचराच गोळा केला जात आहे.

CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

रविवार, दि. १४ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

## निकित टिकाईत व मीना अवारे विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत प्रथम व द्वितीय

**अकोला:** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती ने नुकतीच विद्यापीठाची गुणवत्ता यादी जाहीर केली. त्यात अकोला येथील शासकीय अध्यापक महाविद्यालयातील शिक्षणशास्त्र (बी.एड.) अभ्यासक्रमाचे निकित टिकाईत याने ९.२० सीजीपीए गुण मिळवून गुणवत्ता यादीत प्रथम स्थान प्राप्त केले तर मीना अवारे हिने ९.१८ सीजीपीए गुण प्राप्त करून गुणवत्ता यादीत द्वितीय स्थान प्राप्त केले आहे. या घवघवीत यशामुळे महाविद्यालयाचे नाव निश्चितच उंचावले आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सीमा लिंगायत, डॉ आशु भावसार, डॉ गजानन डोईफोडे, डॉ वर्षा पाठक, डॉ निलिमा शेरेकर, डॉ शुभांगी परळीकर, डॉ. सीमा मुळे, प्रा. अंजुम शेख ग्रंथपाल प्रतिक गुळभेले यांच्या मार्गदर्शनात अभ्यासातील सातत्य व चिकाटीच्या जोरावर दोन्ही विद्यार्थ्यांनी हे नेत्रदीपक यश प्राप्त केले आहे.

# जिल्ह्यातील ५ हजार घरांचे अतिक्रमण नियमानुकूल

प्रतिनिधी १४ डिसेंबर

### ◆ शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांना लाभ

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पट्टेवाटप कार्यक्रमाचे अनुषंगाने सोमवार, दि. ८ डिसेंबर रोजी अमरावती मनपाकडून आठ वसाहती मधील ३०५ पात्र लाभार्थ्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाला. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी संवेदनशीलता दाखवून सदर प्रस्ताव मंजुरीच्या अनुषंगाने तात्काळ दि. ९ डिसेंबर रोजी बैठक घेऊन या प्रस्तावांना मान्यता दिली. यामुळे ३०५ लोकांना तात्काळ घरकुलकरीता शासकीय पट्टेवाटप करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**अमरावती :** सर्वांसाठी घरे उपलब्ध होण्यासाठी शासन स्तरावरून विविध प्रयत्न करण्यात येत आहेत. यामध्ये नागरी भागातील प्रामुख्याने २०११ पूर्वी अतिक्रमण असल्यास ते नियमानुकूल करण्यात येत आहे. जिल्ह्यातील ५ हजाराहून अधिक अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात आली आहे. याचा लाभ शहरीसह ग्रामीण भागातील नागरिकांना झाला आहे.

सर्वांसाठी घरे या योजनेच्या माध्यमातून आजअखेर अमरावती महापालिकेमध्ये एकूण २ हजार ८१२ अतिक्रमण नियमानुकूल करून हक्काचे घर देण्याबाबत कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. तसेच जिल्ह्यातील नगरपालिकांमध्ये ९२० लाभार्थ्यांना या माध्यमातून जमिनीची मालकी उपलब्ध करून घरकुल मंजूर केले आहे. ग्रामीण भागातील बाराशे लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सर्वांसाठी घरे हा अतिशय स्तुत्य उपक्रम केंद्र शासनाने हाती घेतला आहे. या उपक्रमातून समाजातील सर्व घटकांना घरे उपलब्ध करून देण्यात येत आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने देखील हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून घरासाठी अनुदान मंजूर होण्यास पात्र असणारे, मात्र ज्यांच्याकडे स्वतःची जागा नाही, अशा व्यक्तींसाठी महापालिका, नगरपालिका आणि ग्रामीण क्षेत्रातील दि. १ जानेवारी २०११ पूर्वीची अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे.

या कार्यक्रमांतर्गत पंतप्रधान आवास योजना, रमाई योजना, घरकुल योजनेंतर्गत घर मिळण्यास पात्र आहे. मात्र त्यांच्याकडे स्वतःची जागा नसल्याने त्यांना शासनाच्या घरांसाठी योजनेचा लाभ घेता येत नाही, अशा व्यक्तींचे शासकीय जमिनीवर दि. १ जानेवारी २०११ पूर्वी अतिक्रमण अस्तित्वात असल्याचे पुरावे दिल्यास सदरचे अतिक्रमण नियमानकुल करण्याची भूमिका घेतली आहे. यामुळे समाजातील तळागाळातील गरजू व्यक्तींना स्वतःची हक्काची जागा व त्यावर शासनामार्फत विविध योजनेच्या माध्यमातून घर मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे. जिल्ह्यामध्ये पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सदरची योजना युद्ध पातळीवर पूर्ण करणे बाबत निर्देश दिले. सदर योजनेमध्ये उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिल्याने अडचण निर्माण झाली. याबाबत पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी महसूल मंत्री म्हणून शासन स्तरावर पाठपुरावा केला. सदरचा स्थगिती आदेश रद्द करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कागदपत्रे उच्च न्यायालयामध्ये अभ्यासपूर्ण पद्धतीने सादर केली. परिणामी उच्च न्यायालयाने सदर स्थगिती आदेश उठवला आहे. त्यामुळे ही योजना राबवण्यामधील मोठी अडचण दूर झाली आहे.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी देखील ही योजना प्राधान्याने राबवण्यावर भर दिला आहे. मागील आठवड्यात महापालिकेच्या समितीने सादर केलेल्या ३०५ पात्र लाभार्थ्यांच्या यादीला जिल्हाधिकारी यांनी एका दिवसातच मंजुरी दिली आहे. ज्यामुळे महापालिकेतील समितीने पात्र केलेले सर्व प्रकरणे जिल्हास्तरावरील समितीने मान्यता देऊन त्यांना पट्टेवाटप करण्याचा मार्ग खुला केला आहे. आजमितीस जिल्हाधिकारी कार्यालयाकडे याबाबत एकही प्रकरण प्रलंबित नाही. सदर योजना ही अत्यंत लाभदायी असल्याने या योजनेचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिका व जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## अमरावती आयटीआयमध्ये सोमवारी शिकाऊ उमेदवार भरती मेळावा

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**अमरावती :** येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सोमवार, दि. १५ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ भरती मेळावा घेण्यात येणार आहे. या भरती मेळाव्यामध्ये भरतीसाठी चाकण, पुणे येथील महिंद्रा आणि महिंद्रा कंपनी सहभागी होणार आहे. मेळाव्यासाठी आयटीआयमध्ये इलेक्ट्रीशियन, इलेक्ट्रॉनिक्स - मेकॅनिक, इंस्ट्रुमेन्ट मेकॅनिक, मेकॅनिक मशिन टुल मेंटनन्स, मशिनिस्ट, मशिनिस्ट (ग्राइंडर), मेकॅनिक (मोटर व्हेइकल), मेकॅनिक डिझेल, मेकॅनिक रेफ्रिजरेशन आणि एअर कंडिशन, मेकॅनिक ट्रॅक्टर, फिटर, टर्नर, पेन्टर (जनरल), प्लास्टिक प्रोसेसिंग ऑपरेटर, पंप ऑपरेटर कम मेकॅनिक, डिझेल-मेकॅनिक, शिट मेटल वर्कर, टूल अॅन्ड डाइमेकर (प्रेस टूल, जिग्स अॅन्ड फिक्सचर) वायरमन, वेल्डर (गॅस अॅन्ड इलेक्ट्रीक) इत्यादी व्यवसाय उत्तीर्ण १८- २८ वयोगटातील प्रशिक्षणार्थी उमेदवांरानी सहभागी व्हावे.

प्रशिक्षणार्थ्यांनी बायोडाटा आणि मुळ कागदापत्रासह झेरॉक्स प्रती सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच आयटीआयमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर घेण्यात येणार आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लगार एस. के. बोरकर यांनी केले आहे.

## गैर कायद्याची मंडळी जमवुन खुनाचा प्रयत्न करणारा आरोपी ताब्यात

प्रतिनिधी १४ डिसेंबर




**अमरावती :** गुन्हे शाखा यांचे कडुन पोलीस ठाणे राजापेठ येथे दाखल गुन्ह्यात गैर कायदेचे मंडळी जमवुन खुनाचा प्रयत्न करणारा पाहीजे असलेला आरोपी ताब्यात घेण्यात अमरावती पोलिसांना यश आले आहे.

दिनांक ०१-१२-२०२५ रोजी फिर्यादी शुभम जनबंधु यांचे तक्रारी वरुन पोलीस ठाणे राजापेठ अमरावती शहर येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक गु.र.नं क्र ७४३/२०२५ कलम १०९, १९०, १९१(१), १९१(२), १९१(३), ३२४ (३), ३२४(६), ३२४(५), ६१, २९६, ३५१(२) भारतीय न्याय संहीता सहकलम ३ (ग्) (१) () (), ३(२) (न्), अनुसुचित जाती अत्याचार प्रतिबंधक कायदा प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.

सदर गुन्ह्यात २० ते २२ आरोपीतांनी संगणमत करुन हातात तलवारी घेवुन फिर्यादी यांना जिवे मारण्याचा प्रयत्न करुन जातीवाचक शिवीगाळ केली होती. तसेच फिर्यादी यांचे घराजवळील दहशत पसरविण्याच्या उद्देशाने तेथील १०-१२ दुचाकी गाड्यांचे नुकसान केले. सदर गुन्ह्यात पाहीजे असलेला आरोपी नामे आदेश उर्फ एअरटेल संतोष रघुवंशी वय १८ वर्ष व्यवसाय- मजुरी रा. जेवड नगर गल्ली नं. ०१ अमरावती हा गुन्हा घडला तेव्हा पासुन आपले अस्तीत्व लपवुन स्वतः ची अटक चुकविण्या करीता विवीध ठिकाणी वास्तव्य करीत होता. त्याचा तांत्रीक पध्दतीने शोध घेवुन तसेच गुप्त बातमीदारा नेमुन त्यांचे कडुन आरोपी बाबत माहीती प्राप्त करुन सदर आरोपीस जवाहर नगर ग्राउंड येथुन ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपीस पुढील कार्यवाही करीता पोलीस ठाणे राजापेठ यांचे ताब्यात दिले.

सदर ची कारवाई. पोलीस आयुक्त, . अरविंद चावरीया, पोलीस उपआयुक्त (परीमंडळ-०१) गणेश शिंदे . उपआयुक्त (मुख्यालय) . रमेश धुमाळ, पोलीस उपआयुक्त (परीमंडळ-०२). श्याम घुगे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे विभाग) . शिवाजी बचाटे, वरीष्ठ पोलीस निराक्षक संदिप चव्हाण यांचे नेतृत्वाखाली स.पो.नि मनिष वाकोडे, पोहवा सतिष देशमुख, फिरोज खान, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, पोलीस नाईक नाझीमोद्दीन सैय्यद, पोलीस रणजित गावंडे चालक अमंलदार प्रभात पोकडे, गुन्हे शाखा यांनी केलेली आहे.

## चाकू सोबत बाळगून फिरणाऱ्या आरोपीस शहर गुन्हे शाखेने घेतले ताब्यात

प्रतिनिधी १४ डिसेंबर




**अमरावती:** शहरातील सराईत गुन्हेगांरावर पाळत ठेवुन त्यांचा शोध घेवुन त्यांचेवर प्रभावी कार्यवाही करण्याबाबत . पोलीस आयुक्त. अरविंद चावरिया, यांनी आदेशीत केल्यावरून अमरावती शहर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक . संदिप चव्हाण यांचे नेतृत्वात गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार यांनी गुप्त माहितीदार नेमुण खालील प्रमाणे कार्यवाही केली आहे.

दिनांक १३/१२/२०२५ रोजी गुन्हे शाखेचे पथकास पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय माहीती मिळाली की, शेख सलमान रा. म्हाडा कॉलनी, नवी वस्ती बडनेरा नावावा इसम हा वाहेद खान डी.एड. कॉलेज नागपुरीगेट चे समोरील रस्त्यावरून हातात लोखंडी चाकु घेवुन फिरत आहे. अशा मिळालेल्या माहीतीवरून नमूद इसमास वाहेद खान डी.एड. कॉलेज समोर जावून गुन्हे शाखेच्या पथकाने मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले. नमूद इसमाच्या ताब्यातून १ वायना चाकू किं.अ. १,०००/- रु तसेच एक लोखंडी चाकू किं. अ. १,०००/- रू असा एकूण २,०००/- रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमूद आरोपी याचे विरुदध पो. स्टे. नागपुरीमेंट येथे कलम ४/२५, आर्म अॅक्ट सहकलम १३५ मपीका प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी. पोलीस आयुक्त . अरविंद चावरीया पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त . रमेश धुमाळ साहेब, पोलीस उपायुक्त श्याम घुगे सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे शाखा . शिवाजी बचाटे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा वे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांचे नेतृत्वाखाली सपोनि महेश इंगोले, अंमलदार गजानन ठेवले, मंगेश परिमल, मनोज ठोसर, संग्राम भोजने, मिर्झा नईम बेग, सागर ठाकरे, योगेश पवार, संदिप खंडारे, प्रभात पोकले यांनी केली.

## महानगर पालिका भाजपा इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती सुरु

प्रतिनिधी १४ डिसेंबर

### ◆ खा. अनिल बोंडे, प्रविण पोटे पाटील यांची उपस्थिती



**अमरावती:** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या वतीने विविध प्रभागातील इच्छुक उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती आज राजापेठ येथील भाजपा कार्यालयात पार पडल्या. या मुलाखतींना उमेदवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या निवड प्रक्रियेसाठी स्थापन करण्यात आलेल्या पॅनलमध्ये खासदार अनिलजी बोंडे, माजी आमदार प्रविण पोटे पाटील, किरणताई महल्ले, जयंतजी डेहनकर, शिवरायजी कुळकर्णी, दिनेशजी सूर्यवंशी, शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, किरणजी पातूरकर, तुषारजी भारतीय, रविंद्र खांडेकर, सुनील काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. मुलाखतीदरम्यान उमेदवारांचा सामाजिक व राजकीय अनुभव, संघटनात्मक कार्य, जनसंपर्क तसेच पक्षाशी असलेली निष्ठा या बाबींचा सखोल आढावा घेण्यात आला. येणाऱ्या महापालिका निवडणुकीत सक्षम, कार्यक्षम आणि जनतेशी नाळ जुळलेले उमेदवार देण्याचा पक्षाचा प्रयत्न असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या मुलाखतींमुळे अमरावती महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपाची तयारी वेगाने सुरू असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

## रेशनच्या तांदळाचा ट्रक पकडला; ५०० कट्टे जप्त

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**खामगाव:** रेशनसाठी असलेल्या तांदूळाची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याची माहिती मिळताच खामगाव ग्रामीण पोलीस पथकाने मोठी कारवाई करत एम. एच. १९ झेड ५१२८ हा ट्रक अडवून ताब्यात घेतला. तपासात ट्रकमधून तब्बल ५०० कट्टे तांदूळ सापडले. बाजार भावानुसार जप्त केलेल्या तांदुळाची किंमत २६, २४,७५०, तर ट्रक ची किंमत १५,००,००० इतकी असल्याचे सांगण्यात येते.

प्राथमिक कारवाईनंतर ट्रक खामगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला डिटेल करण्यात आला. तांदुळाची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याचा संशय असल्याने उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाने खामगाव तहसीलदारांशी पत्रव्यवहार करत पुढील तपासाची माहिती दिली आहे. पोलिसांनी चालक गोविंदा गोपाळराव मार्कड वय ४९ रा. नांदुरा आणि वाहक योगेश जानराव वय २५ रा. पारस, जि. अकोला यांना ताब्यात घेतले असून तांदूळ नेमका कुठून आणला आणि कुठे नेला जात होता. याबाबत चौकशी होती. सदर कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील, पीएसआाय निलेश लबडे, हेकॉ सुधाकर थोरात, कॉन्स्टेबल विशाल कोळी व पवन मोरे यांच्या पथकाने केली.

## अवैध वाळू वाहतूक करणारी वाहने १५ मिनिटात सोडली; एसडीओंकडे तक्रार

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**खामगाव :** अवैध वाळू वाहतूक करणारी दोन वाहने महसूल पथकाने पकडून येथील तहसील कार्यालय परिसरात लावली. मात्र, अवघ्या १५ मिनिटात दोन्ही वाहने कारवाई न करताच सोडण्यात आल्याचा प्रकार खामगाव शहरात घडला आहे. ही घटना प्रशासनाच्या सीसी कॅमेऱ्यामध्ये कैद झाली असून, तशी लेखी तक्रार उपविभागीय अधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, तालुक्यातील मौजे घाटपुरी शिवारात ९ डिसेंबर रोजी महसूल विभागाच्या पथकाने अवैधरित्या विना रॉयल्टी वाळू वाहतूक करताना दोन मोठे वाहन पकडून खामगाव तहसील कार्यालयात लावली होती. दोन्ही वाहनांमध्ये जवळपास सहा ब्रास वाळूसाठा होता. त्यानंतर पथकाने कारवाई केल्याचे फोटोसेशनही केले. मात्र, अवघ्या १५ मिनिटात काय शिजले की दोनही वाहने कारवाई न करताच सोडून देण्यात आली. सदर वाहन जप्त करताना व सोडून देताना तहसील व उपविभागीय अधिकारी यांच्या इमारतीवर लावण्यात आलेल्या सीसी कॅमेऱ्यात सुध्दा कैद झाली आहेत. दरम्यान उपरोक्त वाहने कारवाई न करताच कुणाच्या आदेशाने सोडण्यात आली की, काही चिरीमिरी घेवून हा प्रकार घडला याबाबत शहरात सद्या वेगवेळ्या चर्चा सुरू असून, विविध प्रश्न उपस्थित होत आहेत.उपरोक्त प्रकरणात उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी यांच्याकडे मुबारक खान यांनी लेखी तक्रार केली असून, कारवाईची मागणी केली आहे. तक्रारीत तहसीलदार सुनील पाटील यांनी वाहन कारवाई न करताच सोडल्याचा आरोप करण्यात आला असून, सीसी कॅमेऱ्यांची पाहणी करून व कारवाई करतानाचा फोटोमध्ये असेलेल्या अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

## फेडरेशन कप करिता विदर्भ कबड्डी मुलींच्या संघाचे सराव शिबिर

प्रतिनिधी १४ डिसेंबर



**खामगांव :** ॲमेचुअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया तथा ॲमेचुअर कबड्डी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र च्या वतीने पाचवी फेडरेशन कप ऑल इंडिया कबड्डी चॅम्पियनशिप दिनांक १२ डिसेंबर ते १४ डिसेंबर २०२५ या दरम्यान होऊ घातली आहे या स्पर्धेकरिता भारतातील विविध राज्यातील संघ सहभागी होणार आहेत त्यामध्ये विदर्भातील मुलींचा संघ सहभागी होत आहे या सहभागी संघात विदर्भातील विविध जिल्ह्यातील मुली विदर्भाचे नेतृत्व करणारा आहेत या अनुषंगाने दिनांक ६ डिसेंबर ते ११ डिसेंबर २०२५ रोजी सुटाळा येथे सराव शिबिर भरविण्यात आलेले होते या सराव शिबिराच्या सांगता समारोपाचे कार्यक्रमाचे अध्यक्ष सतीश भाऊ ईखार चेअरमन रेफ्री बोर्ड विदर्भ कबड्डी असोसिएशन प्रमुख पाहुणे शरद भाऊ वसतकर शिवाजीनगर चे ठाणेदार हेरकर साहेब वाशिम कबड्डी असोसिएशन सेक्रेटरी गोपाल राऊत राष्ट्रीय खेळाडू राजेश परदेशी निलेश बुंदेले हे उपस्थित होते या सराव सिबिराचे आयोजन विदर्भ कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष गणेश चौकशे त्याचबरोबर कबड्डी असोसिएशन बुलढाणा चे जिल्हाध्यक्ष माननीय विजय भाऊ बोदडे यांनी केले आहे विदर्भ कबड्डी संघाचे प्रशिक्षक म्हणून विजय भाऊ बोदडे तथा संघ व्यवस्थापक म्हणून शिवा भाऊ डांगे हे राहणार आहेत विदर्भाच्या मुली च्या कबड्डी संघाने राष्ट्रीय स्तरावर विदर्भ राज्याचे नावलौकिक करावे त्याकरिता गणेश भाऊ चौकशे कपिल चोपडे विशाल खंडारे प्राध्यापक मनोज व्यवहारे विनोद परदेशी चंदेल साहेब आणि समस्त विदर्भातील कबड्डी प्रेमीं तर्फे मुलींच्या संघाला शुभेच्छा दिल्या.

## खरिप व रब्बीचे उर्वरित १ हेक्टरचे अनुदान त्वरीत मिळावे

प्रतिनिधी १४ डिसेंबर

### ◆ क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे तहसीलदारांना निवेदन



**खामगाव:** खरीप व रब्बी हंगामाचे उर्वरित १ हेक्टरचे अनुदान तात्काळ देण्यात यावे, अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे शहराध्यक्ष संतोष रामचंद्र खेर्डे यांनी १० डिसेंबर रोजी तहसीलदार यांना निवेदन देवून केली आहे.

निवेदनात असे नमूद केले आहे की, शेगाव भाग १ ते ५ मधील शेतकऱ्यांकडे ३ हेक्टर जमीन असून सुध्दा त्यांना एका जागी असलेल्या २ हेक्टर जमीनीचेच अनुदान देण्यात आले. उर्वरित १ हेक्टर जमीन ही दुसरीकडे असल्याने त्याचे अनुदान मिळणार नाही, असे तलाठी यांनी सांगितले.

म्हणजे शेतकऱ्यांना खरिप व रब्बी असे दोन्ही मिळून १५ हजार रूपयांचे अनुदान कमी मिळेल.

तरी ज्या शेतकऱ्यांकडे एकीकडे २ हेक्टर व १ हेक्टर दुसरीकडे अशी एकूण ३ हेक्टर जमीन दोन भागात आहे. त्यांना ३ हेक्टरप्रमाणेच अनुदान देण्यात येवून शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. परंतु जर उर्वरित १ हेक्टरचे पैसे देण्यात आले नाहीत तर शेगाव भाग १ ते ५ मधील शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी क्रांतीकारी शेतकरी संघटनेकडून तिव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. निवेदन देते प्रसंगी क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे शहराध्यक्ष संतोष खेर्डे, शिवशंकर नारायण पल्हाडे, शिवकुमार ओमप्रकाश धनोकार, अमोल पुरूषोत्तम खेर्डे, सुरेंद्र श्रीराम शेगोकार, निलेश अरूण नावकार, संजय किसन काठोळे, रविंद्र शालिग्राम शेगोकार, विलास ओमकार पेटकर, उमाकांत जगन्नाथ आसोलकार, नंदकुमार महादेव शेगोकार आदी शेतकरी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. १४ डिसेंबर २०२५

# रस्ते खड्डेमय : आ.वानखेडेंनी उठवला विधानसभेत आवाज

## मतदारसंघासाठी विशेष पॅकेजची मागणी

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**उमरखेड :** उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघातील रस्त्यांची अतिदयनीय अवस्था आणि त्यामुळे नागरिकांना होणाऱ्या प्रचंड त्रासावर आमदार किसनराव वानखेडे यांनी नागपूर हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांवर चर्चेदरम्यान जोरदार आवाज उठवला. मतदारसंघातील रस्ते विकासासाठी विशेष पॅकेज जाहीर करण्याची आग्रही मागणी विधानसभा अध्यक्षांकडे केली.




# अतिवृष्टीमुळे रस्ते, पूल बिघडले ; अधिवेशनात प्रश्न उपस्थित करणार– आ. किसनराव वानखडे

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**यवतमाळ :** यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे उमरखेड-महागाव विधानसभा क्षेत्रातील अनेक रस्ते, पूल मोठ्या प्रमाणावर खराब झाले आहेत. या रस्त्यांमुळे नागरिकांना ... व दैनंदिन जीवनात ... जावे लागत आहे. ... कसान झाल्यामुळे ... तुकीसाठी पर्यायी ... वा लागत असून ... वितहानीचा धोका ... याबाबत आमदार किसनराव वानखडे यांनी ठळक मत व्यक्त केले आहे. ते आगामी हिवाळी अधिवेशनात या रस्त्यांवरील दुरुस्ती, पूलांची उंची वाढवणे व आवश्यकतांच्या अनुषंगाने पूलांचा विस्तार याबाबत प्रश्न उपस्थित करणार आहेत.

उमरखेड, महागाव तालुक्यातील रस्त्यांची अर्धवट स्थिती, पूलांचे धोकादायक स्वरूप आणि अपुरी देखभाल या समस्यांमुळे सामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. आमदार वानखडे यांनी याबाबतच्या सरकारी यंत्रणांकडून तातडीने कारवाईची मागणी केली आहे. त्यांनी अधिवेशनात या प्रश्नांवर सखोल चर्चा करावी, निधी मंजूर करून रस्ते व पूल दुरुस्त करावेत, तसेच या समस्येच्या दीर्घकालीन उपाययोजना लागू कराव्यात, असेही स्पष्ट केले.

उमरखेड विधानसभा मतदार संघातील नागरिक, स्थानिक स्वराज्य संस्था यांचे प्रतिनिधींनी देखील रस्ते, पूलांच्या खराब स्थितीबाबत चिंता व्यक्त केली आहे. शेतकरी, विद्यार्थी व दररोजच्या कामासाठी रस्त्यांवर अवलंबून असलेले नागरिक या समस्येचा मोठ्या प्रमाणावर अनुभव घेत आहेत. हिवाळ्याच्या अधिवेशनात हा विषय उठवून आमदार वानखडे मतदार संघातील वाहतूक, सुरक्षिततेसंदर्भातील समस्यांवर सरकारचे लक्ष वेधणार आहे.




गेल्या दोन वर्षांतील अतिवृष्टीमुळे ग्रामीण रस्ते, जिल्हा मार्ग, राज्य मार्ग तसेच राष्ट्रीय महामार्गांचे मोठे नुकसान झाले आहे. महागाव तालुक्यातील हिवरा संगम आणि दहिसावळी येथील पुलांवरून पाणी वाहल्याने राष्ट्रीय महामार्ग तब्बल १३ तास बंद राहिला होता. ऊस वाहतूक आणि वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वे मार्गाच्या कामासाठी होणारी जड वाहतूक यामुळे रस्ते पूर्णतः खड्डेमय बनले आहेत.

हॅम्प योजनेअंतर्गत सुरू असलेल्या पुसद-उमरखेड-हरडा रस्त्याचे एका वर्षात अवघे एक किलोमीटर सिमेंट कॉंक्रीटचे काम पूर्ण झाले. विडूळ-देवसरी रस्त्याची अवस्थाही तीच आहे. वनक्षेत्रातील रस्ते वनविभागाच्या परवानगीअभावी अपूर्ण राहिले असून नागरिकांना रोजच्या प्रवासात मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. विधानसभेत मतदारसंघातील रस्त्यांच्या दुर्दशेचा सविस्तर पाढा वाचताना आमदार वानखेडे यांनी या समस्यांचे तात्काळ निराकरण करण्यासाठी विशेष पॅकेज जाहीर करावे, वनविभागाची परवानगी त्वरित मिळवावी आणि सर्व कामे पारदर्शक तसेच दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावीत, अशी ठाम मागणी केली.

रस्ते विकासाची कामे जलदगतीने आणि उत्तम दर्जाने पूर्ण व्हावीत, या दृष्टीने विशेष निधी पॅकेजची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# धावंडा नदी सरळीकरण रखडले; पूराचा धोका कायम

प्रतिनिधी १४ डिसेंबर




**दिग्रस :** दिग्रस शहरातून वाहणाऱ्या धावंडा नदीला दर पावसाळ्यात उग्र पूर येतो. नदीच्या वळणदार मार्गामुळे आणि लगतच्या अरुणावती प्रकल्पाच्या पूर्ण भरल्यानंतर पाण्याचा विसर्ग न होण्यामुळे पुराचे पाणी थेट शहरात शिरते. यामुळे घंटीबाबा मंदिर परिसर, वाल्मीक नगर, गंगा नगर, विठ्ठल नगर, भंगीपुरा आदी भागातील रहिवाशांना प्रचंड नुकसान सोसावे लागते.

पूर्वी पूरपाणी हिंदू स्मशानभूमीकडे वळून दुसऱ्या बाजूला वाहून जायचे. मात्र स्मशानभूमीतील संरक्षण भिंतीमुळे आता हे पाणी शहराकडेच वळण्याची भीती आहे. यातून भविष्यात मोठ्या जीवितहानीची शक्यता वर्तवली जात आहे. २००६ च्या महापुरात काही नागरिकांचा बळी गेला होता, तर २०१८ आणि २०२२ मध्येही मोठे आर्थिक नुकसान झाले. गरिबांच्या घरांचे मोठे नुकसान झाले, काही घरें पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आणि प्रशासनाला कोट्यवधी रुपयांचा खर्च करावा लागला. या समस्येवर कायमचा उपाय म्हणून धावंडा नदीचे सरळीकरण आवश्यक असल्याचे नागरिकांचे मत आहे. यासाठी रहिवाशांनी पालकमंत्री संजय राठोड यांच्याकडे निवेदन दिले असून मंत्र्यांनी प्रत्यक्ष पाहणीही केली. मात्र स्थानिक राजकारणामुळे हा विषय रखडला आहे. नदी सरळीकरण झाल्यास भविष्यातील जीवित व संपत्तीहानी टाळता येईल आणि प्रशासनाचा मोठा निधीही वाचेल. पालकमंत्र्यांनी या गंभीर मुद्द्याकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी शहरवासीय करीत आहे.

# रेकॉर्डवरील गुन्हेगाराकडून तलवार जप्त

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**आर्णी :** आर्णी परिसरात अवैध शस्त्र बाळगून संशयास्पदरित्या फिरणाऱ्या रेकॉर्डवरील गुन्हेगाराकडून पोलिसांनी ३३ इंच लांबीची स्टीलची तलवार जप्त केली. याप्रकरणी आर्णी पोलीस ठाण्यात आर्म्स ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१३ डिसेंबर २०२५ रोजी गोपनीय माहितीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार, श्रीरामपूर (पुसद) येथील रेकॉर्डवरील गुन्हेगार गजानन शंकर काळे (वय २३) हा घातपात करण्याच्या उद्देशाने बुटले पेट्रोल पंप परिसरात फिरत असल्याचे समजले. या माहितीच्या आधारे पोलीसांनी दोन साक्षीदारांसह बुटले पेट्रोल पंप परिसरात पाहणी केली.

तेथे गजानन काळे हा हातात पिवळ्या रंगाची पिशवी घेऊन आढळला. पंचांसमक्ष त्याची झडती घेतली असता, पिशवीत लाकडी मुठीची स्टीलची तलवार (लांबी ३३ इंच, किंमत अंदाजे ५००० रुपये) आढळली. ही तलवार अवैधरित्या बाळगल्याप्रकरणी ती जप्त करण्यात आली.

याप्रकरणी आर्णी पोलीस ठाण्यात गु.र.नं. ९९८/२०२५ कलम ४/२५ आर्म्स ॲक्टन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी दारव्हा डॉ. सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक निलेश सुरडकर, सपोनि मिलिंद पारडकर, पोहवा गुनवंत बोईनवाड, नितीन वास्टर, मनोज चव्हाण, पोकॉ आकाश गावंडे, आशिफ खल्लीखाउ व चालक पोहवा योगेश गिरी यांच्या पथकाने केली.



# राशन दुकान महिला बचत गटाच्या नावे; कारभार पती व मुलाच्या हातात

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**उमरखेड :** तालुक्यातील अकोली गावात ग्रामपंचायत निवडीनंतर शासकीय राशन दुकानाचे वितरण अंबिका महिला बचत गटाकडे सोपवण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्ष कारभार हा गटाच्या अध्यक्षा यांचे पती आणि मुलगा चालवत असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. यामुळे गावकऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, बचत गटाच्या अध्यक्षा यांचे पती अनेक महिलांना अर्वाच्य आणि अपमानास्पद भाषेत शिवीगाळ करतात. त्यांचा मुलगा देखील राशनधारकांशी अरेरावीने आणि उद्धटपणे वागतो. या प्रकारांमुळे गावातील महिला आणि राशनधारकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे.

महिला सक्षमीकरणाच्या धोरणाअंतर्गत राशन दुकान महिला बचत गटाला देण्यात आले असताना, प्रत्यक्षात पुरुषांच्याच हातात कारभार असल्याने शासनाच्या उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याची टीका होत आहे. यामुळे महिलांच्या स्वाभिमानाला धक्का बसत असून, बचत गटाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

या पार्श्वभूमीवर अकोली गावातील नागरिकांनी बचत गटाच्या अध्यक्षा आणि सचिवांनी स्वतः पुढाकार घेऊन राशन दुकानाचा पूर्ण कारभार हाती घ्यावा, तसेच पती आणि मुलाचा हस्तक्षेप तात्काळ थांबवावा, अशी ठाम मागणी केली आहे. संबंधित विभागाने या प्रकरणाची त्वरित चौकशी करून योग्य कारवाई करावी, अशीही अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. वेळेत दखल न घेतल्यास पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# आरटीओ चलनाच्या नावाखाली सायबर लुटीचा फंडा

## एपीके फाईलद्वारे व्हॉट्सॲप हॅक; बँक खात्यांवर डल्ला

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**पांढरकवडा :** डिजिटल व्यवहार वाढत असतानाच सायबर ठगांनी नागरिकांना गंडा घालण्याचे नवनवे मार्ग शोधून काढले आहेत. आरटीओ चलन (ई-चलान) असल्याचा बनाव करून व्हॉट्सॲपवर एपीके फाईल पाठवली जात असून, ती डाउनलोड करताच मोबाईल हॅक होऊन थेट बँक खात्यांवर डल्ला मारला जात असल्याचा धक्कादायक प्रकार पांढरकवडा शहरात उघडकीस आला आहे.

येथील तुषार भोयर यांच्या बँक खात्यातून अज्ञात सायबर ठगाने तब्बल ८० हजार रुपये परस्पर काढून घेतल्याने शहरात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे अनेक नागरिकांच्या वैयक्तिक तसेच व्हॉट्सॲप ग्रुपवर 'आरटीओ चलान' किंवा 'SBI रिवॉर्ड' अशा नावाने फेक मेसेज मोठ्या प्रमाणावर फिरत आहेत.

**व्हॉट्सॲप हॅक करूनच फसवणूक :** सायबर ठग नागरिकांचे व्हॉट्सॲप अकाउंट हॅक करत असून, त्याच अकाउंटवरून संपर्कातील इतरांना बनावट चलनाचे मेसेज पाठवले जात आहेत. त्यामुळे ओळखीच्या व्यक्तीकडून मेसेज आल्याने अनेकजण फसवणुकीला बळी पडत आहेत. या मेसेजमध्ये दिलेल्या लिंकवर क्लिक करताच फेक वेबसाईट उघडते आणि दंड भरण्याच्या नावाखाली अनधिकृत एपीके फाईल डाउनलोड करण्यास सांगितले जाते.

### नागरिकांनी घ्यावी ही काळजी



- व्हॉट्सॲप किंवा खासगी क्रमांकावरून आलेला चलनाचा मेसेज संशयास्पद समजावा. कोणतीही लिंक किंवा एपीके फाईल डाउनलोड करू नये. अधिकृत सरकारी लिंक gov.in नेच संपते, याची खात्री करावी. चलनाची खातरजमा थेट अधिकृत आरटीओ किंवा सरकारी पोर्टलवरूनच करावी. डिजिटल युगात सावधगिरी हाच सुरक्षिततेचा एकमेव उपाय असून, फेक चलनाच्या आमिषाला बळी न पडण्याचे आवाहन सायबर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

### एपीके फाईल म्हणजे थेट धोका

- तज्ज्ञांच्या मते, अशा एपीके फाईल्समध्ये हॅकिंग सॉफ्टवेअर किंवा मालवेअर असते. एकदा फाईल डाउनलोड झाली की मोबाईलमधील ओटीपी, बँकिंग तपशील, वैयक्तिक माहिती ठगांच्या हाती जाते आणि काही मिनिटांत खाते रिकामे होण्याची शक्यता असते.

- **सायबर पोलिसांकडे तक्रारींचा ओघ :** सायबर पोलिसांकडे दर आठवड्याला अशा स्वरूपाच्या सरासरी ३ ते ४ तक्रारी दाखल होत असून, वाहतूक दंडाच्या नावाखाली होणारी फसवणूक धोकादायक पातळीवर पोहोचत आहे.

# पुसद-भांबरखेडा बस सेवा पूर्ववत सुरु करा

## सहा गावांतील ग्रामस्थांची एकमुखी मागणी

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**उमरखेड :** उमरखेड तालुक्याच्या शेवटच्या टोकावर असलेले भांबरखेडा गाव व परिसरातील सहा खेडी पुसद-भांबरखेडा या एसटी बस सेवेवर पूर्णतः अवलंबून आहेत. मात्र ही बस सेवा सध्या बंद असल्याने प्रवासी, विद्यार्थी व कर्मचारी वर्गाचे मोठ्या प्रमाणावर हाल होत असून, ही सेवा तातडीने पूर्ववत सुरू करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



या मार्गावरून पुसद तालुक्यातील जगापूर, दगड धानोरा, उमरखेड तालुक्यातील झाडगाव तसेच हदगाव तालुक्यातील वाकी, उंचेगाव व इरापूर येथील नागरिक नियमितपणे प्रवास करीत होते. भांबरखेडा येथे इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत शाळा असल्याने परिसरातील तसेच बाहेरगावाहून येणारे विद्यार्थी व पालक मोठ्या प्रमाणात या बस सेवेचा वापर करीत होते.

यापूर्वी पुसदहून दिवसातून चार फेऱ्या असलेल्या या बस सेवेने नागरिकांची मोठी सोय होत होती.

मात्र सध्या सेवा बंद झाल्याने महिला-पुरुष प्रवासी, विद्यार्थी, नोकरी करणारे कर्मचारी तसेच जिल्हा परिषद शाळा, इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनियर कॉलेजमधील शिक्षक-कर्मचाऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

- पर्यायी वाहतूक सुविधा अपुऱ्या असल्याने प्रवास खर्चात वाढ झाली असून, सुरक्षिततेचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर पुसद-भांबरखेडा एसटी महामंडळाची बस सेवा तातडीने पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी सहा खेड्यांतील ग्रामस्थांनी एकत्रितपणे केली आहे. प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन प्रवाशांची गैरसोय दूर करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# राष्ट्रीय लोकअदालत : ११,६३३ प्रकरणे निकाली

## पुन्हा १३ जोडप्यांचा संसार सावरला

प्रतिनिधी १४ डिसेंबर



**यवतमाळ :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशान्वये १३ डिसेंबर रोजी यवतमाळ जिल्ह्यात आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीला वकील व पक्षकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एका दिवसात तब्बल ११,६३३ प्रकरणे आपसी समझोत्याने निकाली निघाली, तर १३ जोडप्यांचा संसार सावरला गेला. विशेष म्हणजे, पाच ते दहा वर्षांपेक्षा जुनी २५ हून अधिक प्रकरणेही तडजोडीने मिटली.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष शेखर चु. मुनघाटे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील प्रत्येक न्यायालयात ही लोकअदालत आयोजित करण्यात आली होती. उद्घाटन प्रसंगी मुनघाटे यांनी रोपट्याला पाणी घालून कार्यक्रमाचा शुभारंभ केला. यावेळी सचिव दिपक एच. दाभाडे, कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश सि. एल. देशपांडे, जिल्हा न्यायाधीश-२ एस. आर. शर्मा, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष संजय जैन यांच्यासह न्यायिक अधिकारी, कर्मचारी आणि पक्षकार उपस्थित होते.

लोकअदालतीत न्यायालयात प्रलंबित असलेली २,१०० प्रकरणे आणि वादपूर्व टप्प्यातील ९,५३३ प्रकरणे मांडण्यात आली होती. याशिवाय राष्ट्रीयकृत बँका, पतसंस्थांच्या वादपूर्व प्रकरणांचाही समावेश होता. मुनघाटे आणि दाभाडे यांच्यासह सहकारी न्यायाधीशांनी अथक प्रयत्न करून शासकीय अधिकारी, वकील, पक्षकार आणि बँक प्रतिनिधींशी पूर्वतयारीच्या बैठका घेऊन लोकअदालतीचे महत्त्व पटवून दिले.

परिणामी, निकाली निघालेल्या प्रकरणांचे एकूण तडजोड मूल्य १३ कोटी ९५ लाख ८८ रुपये इतके होते. विशेष मोहीम अंतर्गत १,३९१ प्रकरणे निकाली काढण्यात आली. कौटुंबिक न्यायालयाच्या प्रयत्नांमुळे १३ जोडप्यांच्या वैवाहिक जीवनाला नवसंजीवनी मिळाली.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका समित्या, न्यायाधीश आणि कर्मचाऱ्यांच्या समन्वयाने हा उपक्रम यशस्वी झाला. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, सरकारी वकील, उपजिल्हाधिकारी, भू-अर्जन अधिकारी, बँक-विमा कंपन्या, महावितरण, पोलीस, वकील संघाचे मोलाचे सहकार्य लाभले.

# निधी मंजूर असूनही रिंगरोडचे काम रखडले

## वाहतूक कोंडी व अपघातांत वाढ

प्रतिनिधी १४ डिसेंबर

**पुसद :** राज्य शासनाने ४८ कोटी ६४ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असतानाही पुसद शहराच्या रिंगरोड प्रकल्पाचे अलाइनमेंट काम रखडल्याने नागरिकांच्या संतापात भर पडली आहे. १५ जानेवारी २०२४ च्या शासन निर्णयानुसार पुणे येथील सार्थक इंजिनिअरिंग संस्थेची नियुक्ती झाली होती. तीन महिन्यांत पूर्ण होणे अपेक्षित असलेले हे काम आता जवळपास दोन वर्षे उलटूनही सुरू झालेले नाही.

रिंगरोड कृती समितीचे अध्यक्ष अशोक बाबर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला अनेक निवेदने सादर केली आहेत. मात्र, दिरंगाई कायम असल्याने प्रकल्पाच्या खर्चात २५ ते ३० टक्क्यांची वाढ अपरिहार्य झाली आहे. हा अतिरिक्त भार शासनाबरोबरच जनतेवरही पडणार आहे.

रिंगरोड नसल्यामुळे बाहेरून येणारी जड वाहने शहराच्या मध्यवर्ती भागातूनच मार्ग काढत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज चौकात वाहतूक कोंडीचा रोजचा सामना करावा लागत असून अपघातांची संख्याही वाढली आहे. वाहतूक पोलिसांना जड वाहनांचा वाढता भार हाताळणे कठीण जात आहे.

शहर विकास आराखड्यातील तीन प्रमुख डीपी बायपास रस्ते नगरपरिषदेकडून विकसित न झाल्याने नागपूर, चंद्रपूर, वाशिम, औरंगाबाद व पुणे मार्गांची वाहतूक शहरात शिरत आहे. हे रस्ते वेळेत पूर्ण झाले असते तर वाहतूक शहराबाहेरून वळवणे शक्य झाले असते.

उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल यांनी डीपी रोडच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाशी पत्रव्यवहार केला आहे. तरीही सर्वेक्षण व प्रस्ताव प्रक्रियेला वेग न मिळाल्याने नागरिकांची नाराजी वाढत आहे. निधी उपलब्ध असतानाही काम रखडल्याने तातडीने सर्वेक्षण पूर्ण करून रस्ते विकसित करण्याची मागणी आता तीव्र झाली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

रविवार, दि. १४ डिसेंबर २०२५

http://epaper.citynewssuperfast.com


# प्रभागात बाजारपेठेला समस्यांचा वेढा




## प्रभाग क्र. 11



शाहिन अंजूम | जैननबी शे. इब्राहिम | जकाउल हक | डॉ. झिशान हुसैन

सर्वत्र घाण, स्वच्छतेचा अभाव प्रभाग ११ मधील रहिवाश्यांसमोर सर्वात मोठी आणि ज्वलंत समस्या म्हणजे नाल्यांची दुरुस्ती. नाल्यांचे कॉंक्रीटीकरण किंवा सफाई येथील नागरिकांनी कधी पाहिलेली नाही. वीस वर्षांपासून नाल्यांचा प्रश्न तसाच आहे. निवडणुकीत वचन दिले जाते, पण निवडून आल्यानंतर कोणीच लक्ष देत नसल्याची खंत मतदारांनी व्यक्त केली. प्रभागात कोणतीही विकासात्मक कामे झालेली नाही. ठिकठिकाणी कचरा पडून राहतो, पावसाळ्यात पावसाचे पाणी घरांमध्ये शिरते. डासांची मोठी समस्या आहे. रस्त्यांवर पथदिवे नाहीत, रस्ते खराब आहे. कोणताही विकास गेल्या दहा वर्षात झाला नाही. प्रभागातील नाल्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे. समस्या सोडविण्यासाठी कोणीही पुढाकार घेत नाही. आमच्या गल्लीतल्या नाल्यांचे काम कधीच झाले नाही. चिखल, कचरा, दुर्गंधी ही तर रोजचीच समस्या आहे. पावसाळ्यात तर परिस्थिती भयानक होते. पाणी घरात शिरते, सामान खराब होते, आजार वाढतात. निवडणूक आली की सगळ्यांना प्रभाग आठवतो, पण विकास मात्र कधीच दिसत नाही. नाले दुरुस्त करण्याचे आश्वासन वर्षानुवर्षे दिले जात आहे. अंतर्गत रस्त्यांवर पथदिवे नाहीत बहुतांश अंतर्गत रस्त्यांवर पथदिवे नाहीत किंवा बंद आहेत. परिसरातील अंतर्गत रस्ते पथदिवे नसल्याने अंधारात असतात. रात्रीच्या वेळी अनेक चोरीच्या घटना घडतात. प्रशासन किंवा लोकप्रतिनिधी या प्रश्नाकडे कधीच लक्ष देत नसल्याच्या प्रतिक्रिया नागरिकांनी दिल्या.

प्रभाग क्रमांक ११ हा अकोल्यातील जुना व ऐतिहासिक पण आजच्या घडीला सर्वाधिक उपेक्षित भाग आहे. या प्रभागात गवळीपूरा, हनुमान बस्ती, तेलीपूरा, माळीपूरा, जुना कॉटन मार्केट, किराणा बाजार, बैदपूरा, कालाचबुतरा, सराफा बाजार असे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले गजबजलेले भाग येतात. बहुसंख्य मुस्लिम मतदार असलेल्या या प्रभागात २०१७ मध्ये कॉंग्रेसने वर्चस्व राखत चारपैकी तीन नगरसेवक निवडून आणले होते, तर एक अपक्षाने विजय मिळवला होता. या प्रभागाचा विकास कागदावरच असल्याचे वास्तव आहे. पायाभूत सुविधा, नाल्यांची दुरवस्था, खड्ड्यांचे रस्ते, अतिक्रमण, बाजारपेठेतील कोंडी आणि स्वच्छतेचा पूर्णतः अभाव या भागात जानवतो. विशेष म्हणजे हा भाग महानगरपालिका मुख्य कार्यालयासमोरच असूनही सुविधांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. प्रभागात अल्पसंख्याक समाजाचे मोठ्या प्रमाणावर मतदार असून, कॉंग्रेसला कल मिळत आला आहे. स्वच्छता, पथदिवे, नाल्या, रस्त्यांची दुरवस्था अशा मूलभूत समस्या कायम आहेत. प्रभागात गेल्या काही वर्षांमध्ये विकासकामे अपेक्षेप्रमाणे झाली नसल्याने नागरिक नाराजी व्यक्त करीत आहेत.







रस्त्यांची दुर्दशा काही भागातील रस्ते अत्यंत खराब आहेत. खड्डेमय, उखडलेले रस्ते असल्याने बाजारपेठेतील व्यावसायिक संताप व्यक्त करतात. बाजारपेठेत मूलभूत सुविधांचा पूर्ण अभाव आहे. सराफा, जुना कापड बाजार ही ठिकाणे दिवसभर गर्दीने भरलेली असतात. पण येथे स्वच्छतागृहे नाहीत, कचऱ्याची विल्हेवाट लावली जात नाही, पाण्याची व्यवस्था नाही, पथदिव्यांचा अभाव, वाहन पार्किंगची सोय नाही, महिलांना आणि वृद्धांना स्वच्छतागृह नसल्याने प्रचंड त्रास सहन करावा लागतो. बाजारामध्ये रोज प्रचंड गर्दी असते. पण रस्ते इतके अतिक्रमणाने भरलेले आहेत की पायी चालणेसुद्धा अवघड होते. हातगाड्या, फेरीवाले, अनधिकृत दुकाने सगळ्यांनी रस्ते व्यापले आहेत. महापालिकेने अतिक्रमणविरोधी मोहीम काढली तरी ती एक दिवसापुरतीच मर्यादित असते. दुसऱ्या दिवशी पुन्हा सर्व काही तसेच. अतिक्रमणधारकांना पाठीशी घातले जात असल्याने कोणी त्यांना हात लावत नाही, हे सर्वांनाच माहीत आहे.

अकोला शहराचा गजबजलेला व मुख्य बाजारपेठ असलेला परिसर प्रभाग अकरा मध्ये येतो. कापड बाजार, सराफा बाजार अशी मोठी बाजारपेठ असलेल्या परिसराला चहूबाजूंनी अतिक्रमणाचा विळखा पडलेला आहे. काही राजकीय नेते व प्रशासनाच्या इच्छाशक्तीअभावी या भागातील अतिक्रमण वषानुवर्षांपासून 'जैसे थे' आहे. विकासापासून हा परिसर कोसोदूर आहे. रस्ते खराब, स्वच्छतागृहे नाहीत, नाल्यांची अवस्था दयनीय, अशी परिस्थिती प्रभागाची आहे. आमच्या भागात कोणताही विकास झाला नाही, विकासाच्या नावावर फक्त मते घेतली जातात, अशा प्रतिक्रिया परिसरातील नागरिकांनी दिल्या. प्रभाग क्रमांक ११ चा अ भाग हा नागरिकांचा मागास प्रवर्ग अर्थात ओबीसीसाठी राखीव आहे. तर ब आणि क भाग महिला सर्वसाधारण अर्थात खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी आहे. तर ड भाग हा सर्वसाधारण अर्थात खुला आहे.

२०१७ च्या निवडणुकीतील चित्र महापालिकेच्या २०१७ साली झालेल्या निवडणुकीत प्रभाग ११ मधील तीन जागांवर कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार विजयी झाले होते. तर एका जागेवर अपक्ष उमेदवाराचा विजय झाला होता. प्रभाग ११ मधील 'अ' गटात कॉंग्रेसच्या जैननबी शेख (मते ४१६०), 'ब' गटातून कॉंग्रेसच्या शाहीन अंजूम (६३२४), 'क' मध्ये अपक्ष म्हणून डबू सेठ (३८४९), व 'ड' मध्ये कॉंग्रेसचे झिशान हुसेन विजयी झाले होते. मुख्य रस्त्यांवर अतिक्रमणाची समस्या रस्त्यालगत चारचाकी गाड्या लागु नयेत, यासाठी मनपाच्या अतिक्रमण विभागाचे कर्मचारी फेरीवाल्यांना दंड आकारतात. दर दोन महिन्यातून ही मोहीम राबविण्यात येते. मोहीम बंद झाल्यानंतर पुन्हा लघु व्यावसायिक, फेरीवाले अतिक्रमण करतात. अतिक्रमण काढण्याची मोहीम निरंतर सुरुच असते मात्र, आतापर्यंत रस्ते अतिक्रमण मुक्त झाले नाहीत. शहरातील मुख्य रस्ते अतिक्रमण मुक्त होवून मोकळा श्वास कधी घेणार असा प्रश्न आहे. मोहम्मद अली रोड परिसरात अतिक्रमण मोठ्या प्रमाणात आहे. कचरा रोज रस्त्यावर पडलेला असतो. महापालिकेचे वाहन कधी येते, कधी येत नाही, याचा काही ठराविक नियमच नाही. कचरा साचल्याने कुत्रे, माश्या यांचा त्रास वाढतो. सर्वात आश्चर्य म्हणजे महापालिकेच्या मुख्य कार्यालयाच्या अगदी जवळ हा परिसर आहे आणि तरीही स्वच्छतेकडे पूर्ण दुर्लक्ष केले जाते. रस्त्यांची अवस्था वाईट आहे. कोणतीही विकासकामे झाली नाहीत. नाल्यांची दुरुस्ती नाही, रस्त्यांचा खराब, बाजारपेठेत स्वच्छता, शौचालय, पाण्याचा अभाव, अतिक्रमण, वाहतूक कोंडी या समस्या आहेत.




प्रभाग क्र ११ मधील आरआरसी चा **रणसंग्राम** हा कार्यक्रम पाहण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा

### असा आहे हा प्रभाग....

या प्रभागात गवळीपुरा, हनुमान बस्ती, तेलीपूरा, माळीपूरा, कलालची चाळ, सावतराम चाळ, जुना कॉटन मार्केट, जंगम मठ, कोठडी बाजार, किराणा बाजार, बैदपूरा, कालाचबुतरा, सराफा बाजार, मच्छी मार्केट, मोहम्मदअली रोड, भाजी बाजार हा भाग येतो.

# प्रभागाचा असमतोल विकास

## प्रभाग क्र. 12



उषाताई विरक | अजय शर्मा | हरिष अलिमचंदानी | जान्हवी डोंगरे

शहरातील प्रशासकीय व उच्च मध्यमवर्गीयांची सर्वाधिक वस्ती असलेला महत्त्वाचा भाग म्हणून ओळखला जाणाऱ्या प्रभाग १२ मध्ये विकासाच्या बाबतीत असमतोल आहे. शासकीय कार्यालयांचा परिसर चकाचक असून, निवासी भागांमध्ये नागरिकांना अनियमित पाणीपुरवठ्याचा प्रश्न आहे. काही भागांमध्ये रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा व विजेच्या अनियमिततेच्या समस्या कायम आहेत. तर, उच्चभ्रू वस्त्यांमध्ये विकास कामे झपाट्याने पूर्ण झाल्याचे चित्र आहे. शहराच्या मध्यवर्ती स्थानी हा प्रभाग असूनही, अनेक मूलभूत सुविधा लोकांना अद्यापही स्वप्नवत आहेत. 'प्रभागात काही ठिकाणी बरीच विकासात्मक कामे झाली आहेत, पण काही भागात पाणीपुरवठाही नियमित नसल्याचे वास्तव आहे. या प्रभागात अ भाग हा अनुसूचित जातीसाठी राखीव आहे. तर ब भाग ओबीसी महिला अर्थात नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलेसाठी राखीव आहे. क भाग हा खुल्या गटातील महिलेसाठी तर ड भाग हा खुल्या गटासाठी अर्थात सर्वसाधारण म्हणून सुटला आहे.

प्रभाग क्रमांक १२ हा अकोल्यातील निवासी, व्यापारी आणि प्रशासकीय दृष्टीने महत्त्वाचा भाग आहे. आळशी प्लॉट, नवरंग सोसायटी, राधाकिसन प्लॉट याठिकाणी रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण, पाणीपुरवठ्याचा प्रश्न गंभीर पत्रकार कॉलनी, आंबेडकर नगर, महसूल कॉलनी, खोलेश्वर परिसरात पाणीपुरवठा अनियमित आहे. काही वेळा तिसऱ्या दिवशी पाणी येते तर काहीवेळा सात ते आठ दिवसाआड पाणीपुरवठा होतो. ज्या नागरिकांना महापालिकेच्या पाणीपुरवठ्यावर अवलंबून रहावे लागते त्यांना अनियमित पाणीपुरवठ्यामुळे समस्यांना तोंड द्यावे लागते.




प्रभागातील अनेक गल्ल्यांमध्ये रस्ते उखडलेले, खड्डेमय आहेत. प्रभागातील कॉंक्रीट रस्त्यांची अवस्था दयनीय आहे. काही वर्षातच या रस्त्यांना तडे गेले आहेत. गुणवत्तेचा अभाव असल्याने काही महिन्यांतच रस्ते पुन्हा खराब झाल्याने विकास कामांच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.
उद्यानांचे विकासकाम, पथदिवे, पाणीपुरवठा व्यवस्था सुधारलेली दिसते. त्या तुलनेने महसूल कॉलनी, सिव्हील लाईन, पत्रकार कॉलनी येथे विकास दिसून येत नाही. जनता बाजार परिसरात साचलेले कचऱ्याचे ढीग ही अकोलेकरांची मोठी समस्या आहे. आंबेडकर नगर या भागात नागरिकांना आजही अनेक समस्या आहेत. कुठे रस्ते उखडलेले तर पाणीपुरवठा अनियमित होतो. वाहतूक कोंडी अन् अतिक्रमणाचा विळखा तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, मनपा कार्यालय परिसरात वाहनांची दररोज प्रचंड गर्दी असते. त्यामुळे या भागात पार्किंगची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. कार्यालयीन कामानिमित्त येथे येणाऱ्या नागरिकांच्या वाहनांमुळे रस्त्यांवर कोंडी होते. शासकीय कार्यालये असलेल्या संपूर्ण परिसरात रस्त्यांच्या दुर्तफा अतिक्रमण झाले आहे. या समस्येकडे कोणीच लक्ष देत नसल्याने नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागते.







चौवीस हजार लोकसंख्या असलेल्या या प्रभागात काही भागात नाल्यांचे कॉंक्रीटीकरण नाही, रस्ते उखडलेले व निकृष्ट, पाणीपुरवठा अनियमित, विजेच्या खंडित पुरवठ्याचा त्रास, पथदिवे बंद व अपुरे लाईट्स मोठी समस्या आहे. आंबेडकर नगर, पत्रकार कॉलनी, महसूल कॉलनी, सिव्हील लाईन, आळशी प्लॉट, जनता बाजार, रजपूतपूरा, खोलेश्वर, पोलिस वसाहत, नवरंग सोसायटी, तहसील कार्यालय परिसर, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, राधेनगर, राधाकिसन प्लॉट हा भाग प्रभागात आहे. २०१७ च्या निवडणुकीतील राजकीय चित्र महापालिकेच्या २०१७ साली झालेल्या निवडणुकीत प्रभाग १२ मधील चार जागांपैकी तीन जागांवर भारतीय जनता पार्टीने विजय मिळवला, तर एक जागा राष्ट्रवादी कॉंग्रेसने जिंकली होती. प्रभागातील बहुतांश मतदार हा उच्च मध्यमवर्ग व सुशिक्षित श्रेणीत गणला जातो. लोकसंख्या व क्षेत्रफळानेही प्रभाग मोठा आहे. २०१७ साली झालेल्या निवडणुकीत प्रभाग १२ 'अ' गटातून भाजपच्या तिकिटावर जान्हवी संतोष डोंगरे (मते ६३६२), 'ब' मधून हरीश रतनलाल आलिमचंदानी (६७७७), 'ड' मधून अजय रमेशचंद्र शर्मा (४११४) निवडून आले होते. तर कॉंग्रेसच्या तिकिटावर 'क' (३८८८) गटातून उषा जगजितसिंग विरक विजयी झाल्या होत्या. भाजप विजयी ठरलेल्या तिन्ही जागांवर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या उमेदवारांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली होती.

कार्यालय, मनपा कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, तहसील कार्यालय, पोलिस वसाहत यामुळे हा भाग नेहमी गर्दीने गजबजलेला असतो. शासकीय कर्यालयांचा परिसर रस्ते, अंतर्गत नाल्यांचे व्यवस्था व पथदिव्यांमुळे चकाचक आहे. मात्र, निवासी वस्त्यांमध्ये काही मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे वास्तव आहे. महसूल कॉलनी, आंबेडकर नगर, पत्रकार कॉलनी, जनता बाजार, खोलेश्वर, रजपूतपूरा या भागात काही रस्त्यांची दुरवस्था, नाल्यांचे निकृष्ट काम, पाणीपुरवठा अनियमित, विजेचे वारंवार खंडित होणे तसेच कचरा व्यवस्थापनाचा अभाव या समस्या कायम असल्याचे नागरिक सांगतात. एकंदरीत विकास कामांचा असमतोल या प्रभागात दिसून येतो.




### प्रभागातील ही कामे गरजेची

आंबेडकर नगर, खोलेश्वर, पत्रकार कॉलनीतील काही रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण नाल्यांची मोठ्या प्रमाणात साफसफाई व बांधकाम नियमित पाणीपुरवठा व्हावा प्रशासकीय कार्यालयांच्या परिसरात पार्किंग व्यवस्था अंतर्गत रस्त्यांवर पथदिवे बसविणे आवश्यक आहे. प्रभागात समतोल विकास व्हावा अशी नागरिकांची अपेक्षा आहे. नवीन सदस्यांनी ती पूर्ण करावी याकडे लक्ष राही

### समस्यांचे निराकरण व्हावे

शहरातील समस्यांचे निराकरण होणे आवश्यक आहे. त्या शिवाय जनतेच्या ओरडण्याला काही अर्थ उरत नाही. या दृष्टीने नगरसेवकांनी लक्ष घालणे गरजेचे आहे. ही निवडणूक तसेच नवीन सदस्य याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

प्रभाग क्र १२ मधील आरआरसी चा **रणसंग्राम** हा कार्यक्रम पाहण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK